## *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र. रामाआ-नाशिक/द्वितीय अपील क्रमांक :- १३७/२०२०/जळगांव**

१ श्री. सुबोध विलाचंद पाटील, : अपिलार्थी
रा. प्लॅट क्र. १३ ब, विद्यामंदिर कॉलनी, अंमळनेर,
ता. अंमळनेर, जि. जळगांव.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अंमळनेर,
ता. अंमळनेर, जि. जळगांव.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तालुका कृषि अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, अंमळनेर,
ता. अंमळनेर, जि. जळगांव.

**ऑनलाईन सुनावणी दिनांक ०५/०१/२०२२**

अपिलार्थी यांनी दिनांक २८/१२/२०१९ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. त्यामध्ये दिनांक ०५/०१/२०२२ रोजी meet.google.com/oab-scew-wjq या गुगल मिट कोडद्वारे आयोजित ऑनलाईन सुनावणीदरम्यान अपिलार्थी अनुपस्थित होते. तत्कालीन जन माहिती अधिकारी (सेवानिवृत्त) अनुपस्थित होते. विद्यमान जन माहिती अधिकारी उपस्थित होते. तत्कालीन/विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

आज सुनावणीदरम्यान तत्कालीन/विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हे कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्वपरवानगी न घेता संयुक्तिक कारणाशिवाय अनुपस्थित आहेत. वास्तविक सामान्य प्रशासन विभागाने शासन परिपत्रक क्र.संकीर्ण २०१५/प्र.क्र.(२२२/१५)/सहा, दिनांक ०१/१२/२०१५ नुसार खालीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:-

"माहिती उपलब्ध करुन देण्यानुषंगाने संबंधित जन माहिती अधिकाऱ्याने तसेच प्रथम अपिलीय अधिकाऱ्याने माहिती उपलब्ध करुन देण्यात हेतुपुरस्सरपणे टाळाटाळ केल्याचे निदर्शनास आल्यास त्याची गंभीर दखल घेतली जाईल. द्वितीय अपील सुनावणीत तत्कालीन जन माहिती अधिकारी, आयोगाने आदेशित केले असल्यास प्रथम अपिलीय अधिकारी तसेच इतर संबंधित अधिकारी आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय किंवा कोणतीही लेखी सूचना न देता द्वितीय अपिलाच्या सुनावणीस गैरहजर राहिल्यास आवश्यकतेनुसार त्यांच्यावर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात येईल".

शासनाच्या अशा स्पष्ट सूचना असतानादेखील संबंधित तत्कालीन/विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित असल्याने त्यांच्याविरुध्द कारवाई करणे आवश्यक आहे.

अपिलार्थी यांनी द्वितीय अपील अर्जात नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक १५/१०/२०१९ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही. त्यामुळे प्रस्तुत द्वितीय अपील दाखल केले आहे.

सुनावणीदरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक १५/१०/२०१९ रोजीच्या माहिती अर्जान्वये पुढीलप्रमाणे एकुण ५ मुद्यांची माहिती मागितली होती. १) मौजे शहापुर येथील गट नं. १२ प्रमाणे जुन्या पाझर तलावाचे काम महात्मा फुले जन्मभुमी अभियानांतर्गत झालेल्या कामाचे मापन पुस्तिकेची छायांकित प्रत, २) डिझेल बिलांची छायांकित प्रत, ३) कामाच्या अंदाजपत्रकांची छायांकित प्रत, ४) दिनांक १८/०१/२०१६ रोजी मारवड मंडळाचे, मंडळ कृषि अधिकारी म्हणुन पदभार असलेल्या अधिकाऱ्याचे नांव तसेच ५) सोबत दिलेल्या दाखल्याचा जावक क्रमांक व दाखल्याचे व सक्षम अधिकाऱ्याने दिला आहे किंवा नाही, याबाबत सविस्तर माहिती मागितली होती. त्यास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे दिसून येत नाही. तद्नंतर अपिलार्थी यांनी दिनांक २६/११/२०१९ अन्वये प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीदरम्यान द्वितीय अपिलाशी संबंधित उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले असता, असे दिसुन आले की, अपिलार्थी यांनी दिनांक २६/११/२०१९ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २७/१२/२०१९ रोजी निर्णय पारित करुन सुनावणीदरम्यान अपिलार्थीस कार्यालयाकडे उपलब्ध असलेली माहिती समक्ष दाखविण्यात आली व मागितलेली माहिती विनामूल्य देण्यात आली असल्याने प्रथम अपील निकाली काढले आहे.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक १५/१०/२०१९ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविल्याचे दिसून येत नाही. मात्र जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीदरम्यान कार्यालयातील उपलब्ध माहिती समक्ष दाखविली व मागितलेली माहिती समक्ष विनामूल्य देण्यात आली असल्याचे स्पष्ट होते. वास्तविक जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. तथापि, विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, श्री. बोरसे शासकीय सेवेतुन सेवानिवृत्त झालेले असल्याचे नमुद केले. तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस प्रथम अपिलाच्या सुनावणीदरम्यान कार्यालयातील उपलब्ध माहिती समक्ष दाखविली व मागितलेली माहिती समक्ष विनामूल्य पुरविली असल्याने पुनश्च: माहिती पुरविण्याची आवश्यकता नाही.

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) जिल्हा कृषी अधिक्षक, जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालय, जळगांव यांना माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(८) (क) नुसार असे आदेश देण्यात येत आहेत की, या प्रकरणी आयोगास कोणतीही पूर्वसूचना न देता अथवा पूर्व परवानगी न घेता तत्कालीन/विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी, श्री. व्ही. व्ही. वारे अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द वरील परिपत्रकास अनुसरुन नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी.

२) वरील निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक १३७/२०२०/जळगांव निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**(समीर सहाय)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नाशिक**

**प्रति,**

जिल्हा कृषी अधिक्षक, जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालय, जळगांव, ता. जि. जळगांव.

यांनी आयोगाच्या आदेशाची प्रत संबंधित अधिकारी यांना हस्तांतरीत करुन पोच उलट टपाली आयोगाला सादर करावी, तसेच आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी सुनिश्चित करुन अहवाल ३० दिवसांचे आत सादर करावा.

---